MAHARASHTRA POST GRADUATE INSTITUTE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
M.U.H.S., NASHIK
जिल्हा रुग्णालय आवार, त्र्यंबक रोड नाशिक – ४२२००२ Civil Hospital Campus, Triambak Road Nashik - 422002
Tel: (0253) 2997296, 2 539205 Fax (0253) 2539130
Website: www.muhs.ac.in, E-mail: mpgi@muhs

जा.क्र. मआविवि/ लेखा विभाग/ 655 /2026 — दिनांक: 08/05/2026
11/05/2026

प्रति,

....................

....................

**दरपत्रक सुचना क्र......./एमपीजीआय/2026-27**

**विषय :– महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था,मआविवि, नाशिक करीता ऑफिस कपाटे आणि वॉटर कुलर खरेदी करण्याकरीता दरपत्रके मागविणे बाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, मआविवि, नाशिक येथील विविध विभागांकरीता विविध उपयोगी ऑफिस कपाटे आणि वॉटर कुलर+फिल्टर हे खरेदी करणे प्रस्तावित आहे. विविध विभागासाठी ऑफिस कपाट आणि वॉटर कुलर+फिल्टर आवश्यक संख्या व तांत्रिक तपशिल इत्यादी माहिती **"सहपत्र- अ"** प्रमाणे सोबत जोडण्यात आली असून नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे विविध विभागासाठी ऑफिस कपाटे व वॉटर कुलर+फिल्टर या उपकरणांसाठी अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

करीता, विनंती करण्यात येते की **"अधिष्ठाता, महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, मआविवि, नाशिक"** यांचे नावाने प्रसिध्द झाल्यापासुन दि. २१/०५/२०२६ रोजी सायंकाळी 4.00 पर्यंत पावेतो सिलबंद दरपत्रके (तांत्रिक लिफाफा व व्यापारी लिफाफा इ. दरपत्रके एका स्वतंत्र पाकीटात टाकून आणि ही दोन पाकीटे तिसऱ्या पाकीटात ठेऊन) पाठवावीत. दरपत्रकाच्या आणि वरच्या लिफाफ्यावर एमपीजीआय करीता विविध विभागासाठी कपाटे आणि वॉटर कुलर साठीचे दरपत्रक" (Quotation) असे नमुद करण्यात यावे. सदर दरपत्रके खरेदी समितीद्वारे उघडण्यात येतील.

दरपत्रकात नमुद केलेले दर हे व सर्व करांसह (GST) व वाहतूकीसह नमुद केलेल्या ठिकाणी/म.प.वै.शि.सं.सं, म.आ.वि.वि., नाशिक, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, अनंत कान्हेरे मैदानासमोर, त्र्यंबकरोड, नाशिक येथे उपकरणे व साहित्य पोहोच करण्याचे व कार्यन्वित करण्याचे असावेत. दरपत्रकावर आपला जीएसटी क्रमांक व दिनांक नमुद करण्यात यावा.

**दरपत्रकाच्या अटी व शर्ती:-**

1. एका अधिकृत पुरवठेदार व्यक्तीने/फर्मने एकच दरपत्रक सादर करावे. वेगवेगळया फर्मच्या नावाने एकाच पुरवठेदाराने दरपत्रक सादर करु नये.
2. दरपत्रके अधिष्ठाता, महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, मआविवि नाशिक यांचे नावाने सादर करावे, तसेच त्यावर एमपीजीआय करीता विविध विभागासाठी कपाटे आणि वॉटर कुलर+फिल्टर साठीचे दरपत्रके (Quotation) असे स्पष्ट नमुद करण्यात यावे.
३. दरपत्रकासोबत पुरवठेदाराने स्वतःचे किंवा फर्मचे पॅनकार्ड, आधारकार्ड, शॉपॲक्ट परवाना कपाटे वॉटर कुलर कंपनीचे अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र/परवाना इ दरपत्रकासोबत सादर करावे.(सदर कागदपत्रे तांत्रिक लिफाफयात स्वतंत्र ठेवावीत)
4. पुरवठादाराने दरपत्रकात ऑफिस कपाट आणि वॉटर कुलर चे सादर केलेले दर सर्व करांसह **"महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, मआविवि, नाशिक जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, अनंत कान्हेरे मैदानासमोर ,त्र्यंबकरोड, नाशिक"** येथे पोहच करण्याचे व प्रात्याक्षिकासह (Demonstration) कार्यन्वित करण्याचे असावेत. पुरवठेदाराने आपल्या दरपत्रकात वाहतूक खर्च, सेवा खर्च व इतर कोणताही खर्च स्वतंत्रपणे नमुद करु नये. (दरपत्रक हे स्वतंत्र पाकीटात दरपत्रक नमुद करुन ठेवावे)
5. पुरवठेदाराने शासकीय/निमशासकीय कार्यालय इतर प्रतिष्ठीत संस्थेस प्रिंटर/ उपकरणे/साहित्य पुरवठा केल्याचा किमान २ वर्षाचा अनुभाव असणे आवश्क आहे. पुराव्यासाठी पुरवठा आदेशाची (Purchase Order) प्रत जोडणे आवश्यक आहे (उपलब्ध असल्यास जोडावी) (तांत्रिक पाकीटात ठेवावे)
6. पुरवठेदाराने दरपत्रकात / सोबत स्वतःच्या कोणत्याही अटी व शर्ती नमुद करु नये.
7. पुरवठेदाराने दरपत्रकात नमुद केलेले उपकरणे/ साहित्य नविन,सिलपॅक न वापरलेले व प्रमाणित केलेले असावे.
8. पुरवठेदाराने पुरवठा केलेले उपकरणे/साहित्य कार्यान्वित केल्यानंतर मपवैशिवसंसं समितीमार्फत तपासणी/ परिक्षण करण्यात येईल. दरपत्रकातील यादीप्रमाणे व तांत्रिक तपशिलाप्रमाणे नसलेले उपकरणे व साहित्य स्विकारण्यात येणार नाहित.
9. पुरवठा करण्यात येणारे उपकरणे व साहित्यांची WARRANTY/GUARRATY नमुद करावी. तसेच वॉटर कुलर आणि फिल्टर साठी वार्षिक ACMC सह आणि ACMC शिवाय दर नमुद करावा.
10. दरपत्रकातील नमुद ऑफिस कपाटे, वॉटर कुलर व फिल्टर प्रति वर्ष ACMC चे दर/रक्कम नमुद करावी. ACMC घेणे संस्थेस बंधनकारक असणार नाही.
11. पुरवठेदार कपाटे आणि वॉटर कुलर +फिल्टर ज्या उत्पादकाचा पुरविणार असेल त्या उत्पादकाचे नाशिक शहरात सर्विस सेंटर असणे आवश्यक आहे. अधिकृत सर्विस सेंटर नाशिक शहरात असल्याचा पुरावा दरपत्रकासोबत (तांत्रिक लिफाफयात) जोडणे आवश्यक आहे. (तांत्रिक लिफाफयात ठेवावे)
12. सदर दरपत्रक प्रक्रियेत न्युनतम दरपत्रक स्विकारणे संस्थेस बंधनकारक असणार नाही.
13. पुरवठादारांनी तांत्रिक लिफाफयात वरील कागदपत्रे ठेऊन सिलबंद करावा आणि

    'दरपत्रक' पाकीटात दरपत्रक ठेऊन पाकीट सिलबंद करावे आणि ही दोन्ही पाकीटे तिसऱ्या मोठया पाकीटात ठेऊन ते सिलबंद करुन त्यावर कोटेशन फॉर कपाटे आणि वॉटर कुलर +फिल्टर पुरवण असे नमुद करुन संस्थेचा व स्वतःचा पत्ता टाकून सादर करावे. या पध्दतीने सादर न केलेले दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

14. सदर उकरणे पुरवठयाकरीता पुरवठेदारास कोणताही प्रकारच्या अग्रिम अथवा अगावू रक्कम अदा करण्यात येणार नाही. पुरवठयाची कायवाही व कार्यन्वित झाल्यानंतर देयकाची अदायगीची कार्यवाही करण्यात येईल.

15. पुरवठा आदेशाप्रमाणे उपकरणे/साहित्यांचा पुरवठा पुर्ण झाल्यानंतर मुळ देयक सादर करावे.मपवैशिवसस समितीने पुरवठा आदेशाप्रमाणे व कार्यन्वित केल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयक अदायगीची कार्यवाही करण्यात येईल.

16. पुरवठयाच्या देयकाची अदायगी बॅक खात्यात RTGS/NEFT किंवा धनादेशाव्दारे करण्यात येईल.करीता, पुरवठेदाराने देयकासोबत आपल्या बॅक खात्याचा तपशिल सादर करावा.

17.वित्तीय नियमांप्रमाणे रु.30,000/- वरील देयकावर 2 टक्के सेवा कर (T.D.S) आकारण्यात येईल. तसेच रु.2,50,000/- वरील देयकावर 2 टक्के सेवा कर (T.D.S) व 2 टक्के आयकर आकारण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

18. कोणतेही कारण न देता दरपत्रकात बदल करण्याचा,दरपत्रक रददकरण्याचा अधिकार संस्था / विद्यापीठ राखून ठेवत आहे.

19 . दरपत्रकाबाबत न्यायालयीन बाब उदभवल्यास ती नाशिक कार्यकक्षे अंतर्गत येईल.

अधिष्ठाता

(अतिरिक्त कार्यभार)

(म.प.वै.शि.व सं.संस्था नाशिक)

Dean
Maharashtra Post Graduate Institute of Medical Education & Research, MUHS, Nashik

## सहपत्र 'अ'

खरेदी करावयाच्या कपाटे, वॉटर प्युरीफायर आणी वॉटर कुलर चा तांत्रिक तपशील

| अ.क्र. | विवरण नाव | खरेदी वस्तुचे तांत्रिक विवरण | अंदाजे संख्या |
|---|---|---|---|
| 1 | वॉटर कुलर - Storage-<br>cooling<br>Dimention<br><br>Power supply-<br>Material-<br>Warranty- | 80 Lit<br>40 Lit<br>50 to 60 Depth 70 to 80 width<br>120 inch height<br>16 AMP<br>Stainless steal, Rust proof<br>1 Year | 02 |
| 2 | वॉटर फिल्टर - Capasity<br>Cooling<br>Power Supply<br>Warranty<br>UV | 40 Lit<br>230v/ 50 H2<br>1 Year<br>UV Aqua marire | 02 |
| 3 | ऑफिस कपाट - मटेरियल<br>Dimention | 18 GZ Steel<br>36" W* 19" D*78" H<br>15-18 inch shells<br>Color - Grey | 08 |

अधिष्ठाता

(अतिरिक्त कार्यभार)

(म.प.वै.शि.व सं.संस्था नाशिक)

Dean

Maharashtra Post Graduate Institute of Medical Education & Research, MUHS, Nashik

# पुरवठा दाराने स्वतःच्या लेटरहेडवर सादर करावे

## दरपत्रक

**प्रति,**

**मा. अधिष्ठाता,**
**महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय**
**शिक्षण व संशोधन संस्था,**
**सिव्हिल हॉस्पिटल कंपांउड,**
**त्र्यंबक रोड, नाशिक –** 422004

**विषय :– ऑफिस कपाटे आणि ईलेक्ट्रीक वॉटर प्युरीफायर आणि स्टिल वॉटर कुलर पुरवठा करणेकरीता दरपत्रक सादर करणेबाबत...**
**संदर्भ :–** संस्थेचे दरपत्रक मागणी सुचना क्र. ----------/2026-27
दि. .../05/2026

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मपवैशिवसंसं च्या दरपत्रकातील अटी व शर्ती मला मान्य असून, मी संस्थेला दरपत्रकात दिलेल्या तांत्रिक तपशीलानुसार ऑफिस कपाटे आणि Electric Water Purifier व Water Cooler Stainless Steel पुरवठा करणेकरीता खालीलप्रमाणे दर सादर करित आहे.

| अ. क्र. | तपशील | संख्या | प्रतिनग दर GST वगळता) रु. | वस्तु व सेवाकर (GST) टक्केवारी | GST सह एकूण किंमत (अंकी व अक्षरी) (रु) प्रती नग | एकूण किंमत GST सह | वार्षीक ACMC चा दर प्रती नग* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | ऑफिस कपाट | 08 | | | | | |
| 02 | Electric Water Purifier | 02 | | | | | |
| 03 | Water Cooler Stainless Steel | 02 | | | | | |

* ACMC चा दर एक वर्ष वॉरंटी संपल्यानंतर लागु राहतील.

दिनांक :- पुरवठादाराचे नावः-

फर्मचे नाव :-

स्वाक्षरी :-

ठिकाण:- शिक्का :-